# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

**डॉ. प्रभाकर देसाई**
एम.ए., पीएच् डी.
**संचालक**


संदर्भ क्र. विविमं/२०१७–१८/४४० दिनांक : १०/११/२०१७

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली **पुणे शहरातील**
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

**विषय : दिव्यांगांचे मानसिक संतुलन व मानसिक विकलांगता या अनुषंगाने विशेष बैठक**
संदर्भ क्र. : मा. आयुक्त अपंग कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१ यांचे अकआ/माआका/पुणे/२०१७, दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना आणि मा. आयुक्त अपंग कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी सकाळी ०९.०० वाजता विद्यार्थी विकास मंडळ परिसरातील सभागृह (महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार संकुल), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे 'दिव्यांगांचे मानसिक संतुलन व मानसिक विकलांगता' या विषयावर बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

डॉ. नितिन करमळकर, मा. कुलगुरु व नितिन पाटील, मा. आयुक्त अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या प्रमुख उपस्थितित सदर बैठक संपन्न होणार आहे.

आपल्या महाविद्यालय/संस्थेतील दिव्यांगांचे मानसिक संतुलन व मानसिक विकलांगता या विषयीचे **ऐच्छिक काम** करू इच्छिणाऱ्या व्यक्ती/विद्यार्थी विकास अधिकारी यांना **मंगळवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी सकाळी ०९.०० वाजता विद्यार्थी विकास मंडळ परिसरातील सभागृह (महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार संकुल सभागृह)**, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे उपस्थित राहण्याबाबत सूचित करण्यात यावे. कळावे, ही विनंती.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ